ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १० मार्च, १९५४ | अंक १०

## विविध माहिती

**कलकत्ता बँकेला परवाना नाकारला**—कलकत्ता येथील दिनाजपूर बँकेवर बँकिंग कंपनीज ॲक्टच्या २२ व्या कलमांतील दुसऱ्या उपकलमाप्रमाणें रिझर्व्ह बँकेनें नोटीस बजावली आहे. बँकिंगचा व्यवसाय करण्याचा परवाना बँकेला नाकारण्यांत आला आहे. परवाना न मिळाल्यामुळें बँकेला भारतांतील आपले व्यवहार बंद करावे लागतील.

**विंध्य प्रदेशांतील पाटबंधारे**—विंध्य प्रदेश सरकारनें तळीं व कालवे ह्यांसारख्या कामावर आतांपर्यंत ९·७५ लाख रुपये खर्च केले आहेत. विजेचा पुरवठा करून राज्य सरकारला १९५२–५३ सालीं ४,४७,००० रुपये मिळाले. गेल्या वर्षी राज्यांत ५७२ सहकारी संस्था रजिस्टर करण्यांत आल्या. त्या सर्वांचें मिळून भांडवल २·२५ लाख रुपये होतें.

**जर्मनीमधील चित्रपट महोत्सव**—प. बर्लिनमध्यें चालू वर्षाचा चित्रपट महोत्सव ता. १८ ते ३० जूनपर्यंत भरविण्यांत येणार आहे. गेल्या वर्षीच्या महोत्सवांत कांहीं अडचणी निर्माण झाल्यामुळें फक्त सरकारी माहितीपटच दाखविण्यांत आले पण चालू वर्षाच्या महोत्सवांत चांगले भारतीय चित्रपट दाखविण्यांत येतील अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे.

**ऑस्ट्रेलिआच्या बाजारांत जर्मन मोटारी**—ऑस्ट्रेलिअन सरकारनें ३,००० व्होल्क्सवॅगन मोटारी जर्मनीहून आयात करण्यास परवानगी दिली आहे. ह्या मोटारी हॅंबुर्ग बंदरामधून ऑस्ट्रेलिआला पाठविण्यांत येतील. ऑस्ट्रेलिआंत आतांपर्यंत फक्त ब्रिटिश मोटारीच आयात होऊं दिल्या जात असत. प. जर्मनीमधील मोटारींचे कारखानदार ह्या सवलतीमुळें आनंदित झाले आहेत.

**कॅन्सरवरील संशोधन**—धूम्रपानामुळें फुफ्फुसाचा कॅन्सर होतो किंवा काय ह्यासंबंधीं संशोधन करण्यासाठीं ब्रिटनमधील तंबाखूच्या कारखानदारांनीं २,५०,००० पौंड रकमेची देणगी देऊं केली होती. ब्रिटिश मेडिकल रीसर्च कौन्सिलनें सदर देणगीचा स्वीकार केला आहे. देणगी ७ वर्षांत हप्त्याहप्त्यानें मिळणार आहे. ह्याच संशोधन कार्यासाठीं ब्रिटिश सरकारनेंहि लाखों पौंड मंजूर केले आहेत.

**इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन**—भारत सरकार काढणार असलेल्या इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला ७॥ कोटी रुपयांचें कर्ज देण्यांत येणार आहे असें समजतें. त्याशिवाय जागतिक बँकेकडून कॉर्पोरेशनला जें कर्ज मिळणार आहे, त्याची हमीहि सरकार घेईल. कॉर्पोरेशनच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठीं बोर्डावर सरकारतर्फेचा डायरेक्टरहि नेमण्यांत येणार आहे.

**भारतासाठीं पुस्तकें**—भारतासाठीं पुस्तकें जमविण्याची मोहीम न्यूयॉर्क येथें नुकतीच सुरू करण्यांत आली. पहिल्या हजार पुस्तकांचा हप्ता भारतीय कॉन्सल जनरल श्री. डाल ह्यांच्या स्वाधीन करण्यांत आला. हीं पुस्तकें भारतामधील १७ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना वाटण्यांत येणार आहेत. भारताविषयीं आस्था वाटणाऱ्या एका संस्थेतर्फे तीं जमविण्यांत येत आहेत.

**रेल्वेचीं नवीं स्टेशनें**—१९४७ नंतर भारतीय रेल्वेजनीं ६२५ नवीं स्टेशनें बांधून चालू केलीं. ग्रामीण भागांतील तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांची सोय करण्यासाठीं अगदीं थोडा वेळ थांबण्याचीं जीं स्टेशनें खुलीं करण्यांत आलीं, तीं मात्र ह्या संख्येंत धरण्यांत आलेलीं नाहींत.

**चित्रपटव्यवसायांत भारताचा अनुक्रम**— चित्रपटांची निर्मिति आणि रेडिओमालकांची संख्या ह्या बाबतींत अमेरिकेचा अनुक्रम जगांत पहिला लागतो. पुस्तकांचें प्रकाशन आणि दरडोई वृत्तपत्रांचा प्रसार ह्या बाबतींत ब्रिटनचा अनुक्रम पहिला लागतो. चित्रपटांच्या निर्मितींत जपानचा दुसरा नंबर आणि भारताचा तिसरा नंबर लागतो.

**तेलाच्या शोधासाठीं खर्च**—प. बंगालमध्यें खनिज तेलासाठीं जो शोध करण्यांत येत आहे त्यासाठीं एप्रिल, १९५५ अखेर भारतीय सरकार २५ लाख रुपये खर्च करील असा अंदाज आहे. स्टॅंडर्ड व्हॅक्यूम ऑइल कंपनी ७५ लाख रुपये खर्च करील. ह्या कंपनीच्या सहकार्यानेंच तेलाचा शोध करण्यांत येत आहे. भारतीय सरकार २·५ कोटी रुपये जास्तींत जास्त खर्च करील आणि कंपनी ७·५ कोटी रुपये खर्च करील.

**अमेरिकेंतील जाहिरातींचा खर्च**—अमेरिकेंतील चित्रपटांच्या सात वितरकांनीं १९५३ सालच्या पहिल्या दहा महिन्यांत २४,२९,३६३ डॉलर्स एवढी रकम जाहिरातींवर खर्च केली. त्यापैकीं २०,६८,६२३ डॉलर्स इतकी रकम मासिकांतील जाहिरातींवर आणि २,६०,७३० डॉलर्स वृत्तपत्रांतील जाहिरातींवर खर्च करण्यांत आली.

**बंगालमधील दात्याची अखेरची देणगी**—बंगालमधील एक दानशूर गृहस्थ राय बहादूर शशीभूषण डे ह्यांचा ८६ वा वाढदिवस नुकताच साजरा करण्यांत आला. त्यावेळीं त्यांनीं २,७०,००० रुपयांची अखेरची देणगी जाहीर केली. त्यांनीं आतांपर्यंत सार्वजनिक धर्मादाय संस्थांना १०,५३,६०० रुपयांच्या देणग्या दिलेल्या आहेत.

**भारताचें डॉलर कर्ज**—भारताचें डॉलर कर्ज १९५३–५४ ला संपलेल्या पांच वर्षांत २४,३९,५४,१७० डॉलर्सनीं वाढलें. ९६,८६,०२४ डॉलर्सच्या कर्जाची परतफेड झाली.

### इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनला कर्ज मिळणार

भारतामधील विमानवाहतुकीचें राष्ट्रीयीकरण होऊन येत्या ३० तारखेला ८ महिने पूर्ण होतील. ह्या कालावधींत कॉर्पोरेशनला ५७·१० लाख रुपये तोटा होईल असा अंदाज आहे. हा तोटा भरून काढण्यासाठीं भारत सरकार कॉर्पोरेशनला कर्ज देणार असून त्यासाठी अंदाजपत्रकांत तरतूदहि करण्यांत आली आहे. १९५२ सालीं कॉर्पोरेशनला ४६·६७ लाख रुपये तोटा झाला. राष्ट्रीयीकरण झाल्यावर जितका तोटा होईल अशी अपेक्षा होती, त्यापेक्षा तो पुष्कळच अधिक झालेला असल्यामुळें पार्लमेंटचें लक्ष तिकडे वेधणें साहजिकच आहे. आगामी आर्थिक वर्षांतहि तोटा होईल असें धरूनच कॉर्पोरेशननें आपलें अंदाजपत्रक तयार केलें आहे. विमान-वहातूक खाजगी मालकीची होती तेव्हांपेक्षा हा तोटा फारच अधिक असल्यामुळें राष्ट्रीयीकरण झाल्यावर खर्चांत बचत होईल ही आशा नजिकच्या भविष्यकालांत तरी सफळ होईल असें दिसत नाहीं. असें असलें तरी कॉर्पोरेशनच्या रात्रीच्या सर्व्हिससाठी नवीन विमानें घेण्यासाठी १·६ कोटी रुपयांची सोय अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे. एअर-इंडिया इंटरनॅशनल ही कंपनी मात्र फायद्यांत चालू असून कंपनीनें १९५४-५५ सालच्या अंदाजपत्रकांत ५ नवीन विमानें घेण्यासाठी व इतर भांडवली खर्चासाठी ४·४९ लाख रुपयांची तरतूद केली आहे. कंपनीच्या नजिकच्या कार्यक्रमांत ब्रिटनला जाणाऱ्या विमानांच्या खेपांत वाढ करणें, पूर्व आफ्रिकेच्या खेपांत वाढ करणें, हाँगकाँग, टोकिओ व शक्य तर ऑस्ट्रेलिया ह्या मार्गावर विमानें चालू करणें, इत्यादि बाबी आहेत. त्यासाठी अधिक विमानांची जरूर भासूं लागली आहे. आंतरराष्ट्रीय विमान-मार्गावर परदेशी कंपन्या जोराची स्पर्धा करूं लागल्या आहेत. त्यांच्याशीं टिकून रहावयाचें असेल तर एअर-इंडिया इंटरनॅशनल कंपनीला आपल्या व्यापाची वाढ करावीच लागेल.

### उ. प्रदेशांतील मंदीचा परिणाम

उत्तर प्रदेश सरकारच्या मजूर खात्याचा गेल्या वर्षाचा अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, गेल्या वर्षीं सुरू झालेल्या मंदीचा परिणाम बराच व्यापक प्रमाणांत झाला आहे. १९५३ सालीं उत्तर प्रदेशांत १०२ कारखाने बंद करण्यांत आले. ह्या सर्व कारखान्यांत मिळून १०,३४३ कामगार काम करीत होते. १९५२ सालीं एकूण ५९ औद्योगिक कारखान्यांना आपलें काम बंद ठेवावें लागलें होतें आणि त्या निमित्तानें ५,३७३ कामगार रोजगारीला मुकले होते. व्यापारांतील मंदीमुळें इतक्या कारखान्यांना उत्पादन थांबवावें लागलें, असें मत अहवालांत व्यक्त करण्यांत आलें आहे. कापडाच्या धंद्याविषयीं एका नवीन प्रवृत्तीची नोंद अहवालांत करण्यांत आली आहे. उत्तर प्रदेशांत विणकाम करणारे मोठे कारखाने पुष्कळ आहेत. पण आतां मोठ्या प्रमाणावरील गिरण्या कमी होत असून त्यांच्या जागा लहान लहान गिरण्या घेऊं लागल्या आहेत. तथापि ही प्रवृत्ति सर्व देशभरच दिसून येत असल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. १९५३ सालीं टाळेबंदी, संप व कामगार कमी करणें ह्या तीन कारणांमुळें ६,७८,८४९ कामाचे दिवस वायां गेले. १९५२ सालीं ७,४६,५२८ दिवस आणि १९५१ सालीं ११,४९,२५० दिवस वायां गेले होते. कामाचे दिवस वायां जाण्याचें प्रमाण १९५१ पासून उतरत गेलेलें वरील आंकड्यांवरून दिसून येतें. तथापि ह्या आंकड्यांत कानपूरमधील स्वदेशी कॉटन मिलसमध्यें महिनाभर चाललेल्या भांडणामुळें व्यर्थ गेलेला काळ धरलेला नाहीं. विणकामाच्या मोठ्या गिरण्यांची जागा लहान गिरण्या कां घेत आहेत, ह्यासंबंधीं तपास होणें जरूर आहे.

### ऋण आणि क्षण

( ले.-श्री. श्रीपाद वामन काळे, दुर्गाविवास, पुणें ४ )

जीवन सुखी करण्यास जगांत कुशलतेनें कसें वागावें याबद्दलचें यांतील मार्गदर्शन महत्त्वाचें आहे. कणाकणाचा व क्षणाक्षणाचा उत्तम विनियोग करण्यासाठी लेखकानें यांतील तीसहि लेखांतून प्रेमळपणें सांगितलेला कर्मयोग उत्कृष्ट असून तो सर्वांना हितप्रद असल्यानें पुस्तक वाचनीय, मननीय नि संग्राह्य आहे. पृ. १६८, मूल्य २॥ रु.

—" भारत मित्र, गोवा "
जानेवारी, १९५४


# NOTICE

## THE BELGAUM BANK LIMITED, BELGAUM

Notice is hereby given that the Annual General Meeting of the Share-Holders of the Bank will be held on Tuesday, 23rd March 1954 at the Bank's New Building at Rawiwar Peth, Belgaum at 1 p. m. to transact the following business:

(1) To receive and adopt the report of the Directors and the audited Statement of accounts for the year ended 31st December 1953.

(2) To declare a Dividend.

(3) To fill up the vacancies caused by the retirement of the Directors mentioned below.

1. Shri. L. V. Deshpande
2. Shri. J. W. Kalaghatagi
3. Shri. G. N. Kulkarni
4. Shri. H. M. Jamadar

The retiring Directors are eligible for re-election and they offer themselves for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To do such other work as may be placed before the meeting with the permission of or by the Chairman.

BELGAUM
16-2-1954

By Order of the Board.
**G. L. Gajendragadkar,**
*Chairman.*

Share-holders desiring to ask any question at the General Meeting are requested to send them to the Chairman before the 15th March 1954 for convenience.

The transfer Books of the Company will be closed from 5th March 1954 to 23rd March 1954 both days inclusive.

The Dividend when sanctioned will be paid on or after 30th March 1954. The Share-holders are requested to communicate their change of address if any.

# अर्थ

बुधवार, ता. १० मार्च, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## राष्ट्रीय विकासाला जनतेच्या त्यागाची बैठक हवी

### अर्थमंत्रि श्री. देशमुख ह्यांचा उपेक्षित इषारा

"राष्ट्रीय विकासाची जबाबदारी फक्त सरकारांवरच टाकून चालणार नाहीं. आपल्या प्रजासत्ताक देशांत लोकांवरहि त्याची जबाबदारी पडते आणि मोठ्या प्रमाणावर नोटा छापून बराच खर्च भागविण्याचें आपण आतां ठरविलें असल्यामुळें, जनतेनें जास्त बचत करून सरकारला जास्त रकमा कर्जाऊ द्याव्यात, असें माझें आग्रहाचें सांगणें आहे. छोट्या बचतींच्या मार्गानें उपलब्ध व्हावयाचा पैसा अपेक्षेपेक्षा कमी असून तो कांहींसा निराशाजनक आहे. बचतीच्या मोहिमेस सर्व आघाडींवर हातभार लावणें, हें जनतेचें कर्तव्य आहे. त्याखेरीज दीर्घकालीन विकास-योजना चालू ठेवणें कठीण जाईल. विकास म्हटला कीं त्याग हा आलाच आणि ह्या त्यागाचा बोजा योग्य प्रमाणांत सर्वांवर बसावा आणि तो तत्परतेनें आणि खुषीनें उचलला जावा, हें लोकशाही योजनांचें मर्म आहे. भांडवलवाढीचें उद्दिष्ट सर्वमान्य आहे व तें साध्य होण्यासाठीं चालू खर्च मर्यादेंत राखला पाहिजे आणि उत्पादनांत वाढ करीत गेलें पाहिजे; म्हणजे, एकीकडे उपासमार करीत असतांनाच अधिक कष्ट केले पाहिजेत. अधिक नेटाच्या प्रयत्नांची आतां आवश्यकता आहे."

१९५४–५५ चा मध्यवर्ती सरकारचा अर्थसंकल्प सादर करतांना श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं जनतेला वरीलप्रमाणें आवाहन केलें आहे. परंतु त्याकडे कोणाचेंच लक्ष गेलेलें दिसत नाहीं. प्रत्यक्ष सरकारकडून वृत्तपत्रांना पुरविण्यांत आलेल्या त्यांच्या भाषणांत ह्या महत्त्वाचा भाग अगदींच संक्षेपानें दिलेला आढळतो. साहजिकच, श्री. देशमुख ह्यांची हांक सामान्य मनुष्याच्या कानांपर्यंत पोंचलीच नाहीं, तर त्यांत आश्चर्य नाहीं. आपल्या विकासाच्या भांडवलाची तरतूद शेवटीं आपणच केली पाहिजे. परदेशी मदत, कर्जें, इत्यादींवर अवलंबून राहून भागणार नाहीं. कोणत्याहि देशाचा उत्कर्ष ह्या मार्गें झालेला नाहीं; होणार नाहीं. सरकारी खर्चासाठीं लागणारा पैसा कर आणि जनतेनें स्वाधीन केलेली बचत ह्यांचेद्वारांच मिळूं शकतो. करामध्यें सक्तीचा भाग असतो, तर बचतीमध्यें स्वेच्छेस प्राधान्य असतें. कांहीं झालें तरी, रोजच्या गरजा आणखी कमी करून म्हणजे बचत वाढवूनच भांडवल-संचयास हातभार लावतां येईल. २५० कोटी रुपयांचीं ट्रेझरी बिलें रिझर्व्ह बँकेस देऊन त्यांच्या बदली नोटा घेऊन त्यांचे द्वारां खर्च भागविणें, ही नाइलाजाची बाब आहे.

बँकेच्या तिजोरींतून एकाद्यानें एक लक्ष रुपये उचलले व त्यांचा किफायतशीर उपयोग केला, तरच उचल्याला हें लक्ष रुपये परत तिजोरींत ठेवतां येतील. परंतु, सहज हाताशीं आलेल्या ह्या रकमेचा त्यानें दुरुपयोग करून उधळपट्टी केली, तर त्याची पंचाईत झाल्याविना रहाणार नाहीं. नोटा छापून (डेफिसिट फायनन्स) खर्च भागविण्याचा प्रकार त्याच पद्धतीचा आहे. हा खर्च उत्पादक कार्यांसाठीं कार्यक्षमतेनें करण्यांत आला तरच उपयोग; पैशाचा अपव्यय झाला तर डेफिसिट फायनान्स अयशस्वी झाल्याविना रहाणार नाहीं. एकूण खर्चाच्या मानानें नोटा छापून किती तरतूद करणार, हा प्रश्न जसा महत्त्वाचा आहे, तसाच जनतेच्या त्यागाच्या मानानें डेफिसिट फायनान्सचा आकार केवढा आहे, हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. अर्थमंत्र्यांनीं ह्या बाबतींत जनतेच्या सहकार्याची जी अपेक्षा बाळगली आहे, ती फलद्रूप होवो, ऐवढेंच येथें म्हणणें युक्त होईल. जनतेच्या त्यागावरच् पंचवार्षिक योजनाच नव्हे, तर भारताचें स्वतंत्र अस्तित्वच अवलंबून आहे, ह्याची जाणीव लोकांना जितकी लवकर होईल तेवढें चांगलें. लोकशाहींत ह्या त्यागाचा बोजा समाजाच्या सर्व घटकांत योग्य व न्याय्य प्रमाणांत वाटला गेला पाहिजे हें उघड आहे. श्री. देशमुख ह्यांनीं ह्या गोष्टींचा उल्लेख त्यांच्या भाषणांत केलेलाच आहे.

## वाढत्या लोकसंख्येबद्दल शास्त्रज्ञाचा इषारा

उत्क्रांतिवादाचे जनक चार्लस डारविन ह्यांचे नातू सर चार्ल्स डार्विन ह्यांनीं दिल्ली विद्यापीठांत मानवी भवितव्याबद्दल नुकतें एक व्याख्यान दिलें. त्यांनीं रेखाटलेलें भवितव्य अविकासवाद आणि निराशाजनक आहे. माल्थसच्या लोकसंख्येबद्दलच्या सिद्धांताचा आधार घेऊन ते बोलत होते. पण माल्थसच्या वेळे उपलब्ध नसलेले लोकसंख्येचे आणि शेतीबद्दलचे बरेच आंक त्यांनीं ह्याप्रसंगीं दिले. ते म्हणाले कीं, आणखी २,००० वर्षां लोकसंख्या इतकी वाढेल कीं पृथ्वीवर पाऊल ठेवायला सुद्धा जागा उरणार नाहीं. प्रत्येक १०० वर्षांत जगाची लोकसंख्य दुप्पट होत चालली आहे. लोकसंख्येच्या ह्या वाढीच्या प्रमाणां अन्नाचें उत्पादन वाढविणें शास्त्रीय प्रगतीमुळें शक्य होईल अ त्यांना वाटत नाहीं. प्रजोत्पादनाला स्वेच्छेनें आळा घालण्याइतक सुधारणा मनुष्यजात करील अशीहि शक्यता नाहीं. मनुष्य जातीचा विकास होतांना कांहीं नवीन गुण उत्क्रांत झा आहेत. पण ते आनुवंशिक होत नाहींत. अर्थातच मनुष्य सुधा शकेल असा विश्वास त्यांना वाटत नाहीं. जगांतील कांहीं शहाण्य लोकांनीं आपण होऊन बेताचें प्रजोत्पादन केलें तरी असें करणाऱ्यांच्या प्रचंड लोंढ्यांत ते वाहून जातील. शास्त्रीय शोध मुळें जे कांहीं फायदे झाले त्यांचा आतां कमी कमी परिणा होऊं लागला आहे आणि जगापुढें भुकेचा प्रश्न पुन्हां उ टाकला आहे. आजच्या जगांत राजकारणांत जें प्रक्षुब्ध वातावर निर्माण झालें आहे त्याचें प्रमुख कारण म्हणजे भूक हेंच आ लोकसंख्या कमी होण्यासाठीं उपासमार आणि युद्ध ह्या दो मार्गांखेरीज अन्य मार्ग त्यांना दिसत नाहींत. राहणीचें मा वाढलें कीं प्रजा कमी निर्माण होते हें त्यांना पटत नाहीं, आ तसें होत असेल तरी सुद्धां जगांत कच्च्या मालाचा पुरव बेताचा असल्यामुळें सर्व लोकांना समृद्धीचे दिवस येत हें शक्यच नाहीं.

## पुणें सें. को. बँक लि.

### दौंडशाखेचा रौप्यमहोत्सव

दि पूना सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँकेच्या दौंड शाखेचा रौप्यमहोत्सव सहकारीमंत्री ना. एम्. पी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली थाटानें साजरा झाला. श्री. एम्. पी. पाटील यांनी आपल्या भाषणांत सांगितलें, " शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी त्यांनीं पिकविलेला माल सहकारी पद्धतीनें खरेदी-विक्री करण्याची सोय झाली पाहिजे व आपल्या सहकारी चळवळीस सचोटीचा व्यवहार पाहिजे व क्रेडिटिंगबरोबरच मार्केटिंगचेंहि अंग असलें पाहिजे. सहकारी चळवळ ही लोकांची चळवळ (पीपल्स मूव्हमेंट) आहे. जनतेनें व सरकारनें सहकार्यानेंच त्यांतील दोष काढून कार्यक्रम आंखून काम केल्यास आपण आपली व राष्ट्राची प्रगति करूं शकूं."

### टोकियोंत दाट वस्ती

टोकियो हें जगांतील तिसऱ्या अनुक्रमाचें मोठें शहर आहे. १९५३ अखेर त्याची लोकसंख्या ७५,००,००० होती. त्यांत दरसाल ४,००,००० लोकांची भर पडत आहे. म्हणजे, सहा-सात वर्षांत टोकियोची लोकसंख्या १ कोटी होईल ! टोकियो शहरांत पोट भरण्याच्या अपेक्षेनें बाहेरून एकसारखे लोक येत असतात, त्यामुळें गर्दी वाढत जाते. टोकियोंत विद्यार्थ्यांची संख्याहि फार मोठी आहे. १९४४-४५ च्या बॉबहल्ल्यामुळें टोकियोंतील ६०% घरांचा नाश झाला आणि युद्धापूर्वीच्या मानानें आतां २,५०,००० घरें कमीच आहेत, ह्यावरून हलाखीची कल्पना येईल. असें असूनहि आशियांतील कोठल्याहि शहरांपेक्षा टोकियोंतील घरें, पाणीपुरवठा, स्वच्छता, शाळा, वहातुक, इत्यादींचा दर्जा चांगला आहे आणि पाश्चिमात्य शहरांशीं तुलना होण्याइतका तो उच्च आहे. कलकत्ता किंवा कैरो येथल्या मानानें टोकियोंतील वस्तीचा गलिच्छपणा कांहींच नाहीं, असें म्हणतात.

### इं. फि. कॉर्पोरेशनच्या अध्यक्षांचा राजीनामा

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे चेअरमन, लाला श्रीराम, ह्यांनीं आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. रेल्वेजचे फिनॅन्शिअल कमिशनर, श्री. पी. सी. भट्टाचार्य, ह्यांना तात्पुरते चेअरमन करण्यांत आलें आहे. पार्लमेंटांत, कॉर्पोरेशनच्या चौकशी-कमिटीच्या अध्यक्ष, श्री. सुचेता कृपलानी, ह्यांनीं "सरकारनें कमिटीच्या अहवालाबाबत लोकांची दिशाभूल केली आहे" असा सरकारवर आरोप केला. " कमिटीनें रिपोर्टांत मुद्दामच जरा सौम्य भाषा वापरली, ह्याचा अर्थ कॉर्पोरेशनवरील आरोपांतून तिची मुक्तता केली, असा नव्हे" असें त्यांनीं स्पष्ट सांगितलें. " कॉर्पोरेशननें कर्जाऊ दिलेल्या १५·२२ कोटि रुपयांपैकी ६·३३ कोटि रुपये कॉर्पोरेशनच्या १२ पैकी ६ डायरेक्टरांचा ज्यांत हितसंबंध आहे, अशा कंपन्यांना दिले गेले आहेत" असें डॉ. लंकासुंदरम् ह्यांनीं सांगितलें. कमिटीच्या रिपोर्टावरील चर्चा अद्याप संपलेली नाहीं.

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

वरील बँकेच्या सालोसाल होत असलेल्या प्रगतीची कल्पना सोबतच्या तक्त्यावरून येईल. १९५३ सालापुरतें पाहिलें, तर १९५२ चे मानानें ठोक नफा ज्यास्त झाला तरी बँक्स एम्प्लॉईज युनियनबरोबर अहवालाचे वर्षी झालेल्या करारानुसार बँकेस २०,००० रु. चा जादा बोजा सहन करावा लागला, त्यामुळें निव्वळ नफा थोडा कमी झाला. अन्नधान्यावरील नियंत्रणें आतां उठलीं असल्याकारणानें कर्जास मागणी वाढून बँकेचा धंदा ज्यास्त किफायतशीर होईल अशी अपेक्षा आहे. बँकेची स्वतःची इमारत पुरी झाली असून तिचेमध्यें सर्व खात्यांच्या कचेऱ्या काम करूं लागल्या आहेत. सेफ डिपॉझिट व्हॉल्टहि लोकप्रिय होत आहे. सरकारी रोख्यांवर आगाऊ कापून घेतलेला इन्कमटॅक्स अहवालाच्या वर्षाच्या नफ्यावर कर भरण्यास पुरेसा आहे. जयसिंगपूर येथें बँकेची एक शाखा १ जानेवारी, १९५४ रोजीं उघडण्यांत आली आहे. म्हणजे, बँकेच्या आतां बेळगांव जिल्ह्यांत ११, रत्नागिरी जिल्ह्यांत ७, धारवाड जिल्ह्यांत १, द. सातारा जिल्ह्यांत १ व कोल्हापूर जिल्ह्यांत २ अशा शाखा आहेत. जानेवारी १९५५ मध्यें बँकेस २५ वर्षें पुरीं होतात, त्याचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यासाठी " सिल्व्हर ज्युबिली फंडा "कडे १५०० रु. वर्ग करण्यांत आले आहेत. भागदारांना ५% करमाफ डिव्हिडंड मिळणार आहे, त्यासाठी ३०,००० रु. लागतील. वसूल भांडवल ६,००,००० रु., रिझर्व्ह व इतर फंड १,९४,०६९ रु., ठेवी ८४,४३,९१२ रु., रोख व बँकांत २०,४८,०३७ रु., इन्व्हेस्टमेंट २९,४८,६६४ रु., कर्जें ४८,४१,२९५ रु., इमारत २,१६,४९३ रु. असा ताळेबंदाचा ढोबळ तपशील आहे. बँकेनें इतर बँकांकडून कर्ज घेतलेलें नाहीं; त्याचप्रमाणें बँकेचे डायरेक्टर किंवा इतर अधिकारी किंवा त्यांच्या कंपन्या आणि फर्म्स ह्यांनीं बँकेकडून कर्ज मुळींच काढलेलें नाहीं; हें अहवालाचें उल्लेखनीय वैशिष्ट्य आहे. अशा डायरेक्टरांना कर्जमंजुरी व कर्जवसुली ह्याबाबतींत इष्ट तें धोरण निःसंकोचपणें अवलंबितां येतें, हा बँकेचा मोठाच फायदा होय. ( चेअरमन : जी. एल. गजेंद्रगडकर, बी. ए., एम. बी. ई; मॅनेजिंग डायरेक्टर : ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी, एलएल. बी; मॅनेजर : एच. एस. कुलकर्णी, बी. ए., )

**बेळगांव बँकेच्या प्रगतीचा तक्ता**

| | १९४२-४३ | १९४६-४७ | १९५० | १९५२ | १९५३ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ९९,८८० | ४,६१,१७० | ६,००,००० | ६,००,००० | ६,००,००० |
| फंड | १६,१२७ | ८२,९३७ | १,४१,७५४ | १,७६,२०७ | १,९४,०६९ |
| ठेवी | १४,१३,७८३ | ४२,१२,६१९ | ५८,५१,७४४ | ७५,०७,६१५ | ८४,४३,९१२ |
| कर्जें | ९,९८,९०३ | १४,९६,२५६ | ४५,१९,७८१ | ३७,१२,३६२ | ४८,४१,२९५ |
| निव्वळ नफा | १०,९६९ | ३१,११३ | ९२,३३१ | ६५,५८५ | ७४,१३६ |
| डिव्हिडंड ( करमाफ ) | ६¼% | ६¼% | ६¼% | ६¼% | ५% |
| खेळतें भांडवल | १५,४५,१५८ | ५४,६०,९५७ | ८२,२५,७७६ | ९२,९३,५०७ | १,०८,२२,१०८ |

# दि बँक ऑफ महाराष्ट्राची वार्षिक सभा

**अध्यक्ष, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांचा अध्यक्षीय आढावा:**

"एकंदर युद्धोत्तर कालाचा विचार करतां १९५३ हें वर्ष बरेंच आशादायक गेलें. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रांत या वर्षी अपेक्षेपेक्षाहि अधिक घटना घडल्या. पण त्यामुळें जगापुढील पूर्वीच्या समस्या सुटण्याऐवजीं नवीन मात्र निर्माण झाल्या असेंच म्हणावें लागेल. कोणताहि प्रश्न संबंधी–राष्ट्रांच्या अपेक्षेप्रमाणें सुटलेला नाहीं. कोरियांत युद्धबंदी झाल्याला दोन वर्षे झालीं, पण त्यामुळें शांतता प्रस्थापित झाली आहे असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. कोरियांत भारताच्या शांतिसेनेनें केलेलें कार्य कितीहि प्रशंसनीय असलें तरी त्यामुळें मुख्य प्रश्न सुटलेला नाहीं. नुकत्याच झालेल्या बर्लिन परिषदेबाबत आतांच कांहींहि मत प्रदर्शित करणें अकालीं ठरेल. परंतु लवकरच जिनीव्हा येथें भरणाऱ्या परिषदेंत अधिक कांहीं निष्पन्न होईल असा विश्वास जागतिक लोकमतांत ती निर्माण करूं शकली नाहीं. इराण, इजिप्त, आफ्रिका आणि अगदीं भारताच्या सीमेवर काश्मीरमध्यें घडणाऱ्या घडामोडी किंवा इंडोचायनांतील चकमकी या तर नित्याच्या बाबी आहेत व त्या शांततेला बाधक आहेत. परंतु त्यानंतरची एकंदर विचारप्रवाहाची दिशा पाहतां आतां युद्ध ओढवून घेण्यास कोणीहि तयार आहे असें वाटत नाहीं. याचें प्रत्यंतर म्हणून प्रे. आयसेन हॉवर यांच्या अणुशक्तीवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण ठेवण्याच्या सूचनेकडे बोट दाखवितां येईल. युद्धाबद्दलच्या या सर्वसाधारण तिरस्काराच्या भावनेमुळें शांतता परिषदा आणि वाटाघाटी यांची त्रासदायक अखंड मालिकासुद्धां सुसह्य वाटेल.

### भारताची आर्थिक घडी

"आर्थिक क्षेत्रांत पाहतां उत्पादन आणि आंतरराष्ट्रीय व्यापार या बाबतींत गेल्या वर्षी अपेक्षित प्रगति झाली व त्याचा फायदा कमी–जास्त प्रमाणांत सर्वांना मिळाला. उत्पादनशक्तींत याप्रमाणें वाढ झाली व नवीन नवीन देश जागतिक बाजारपेठेंत मोठ्या प्रमाणांत भाग घेऊं लागले. पण त्याचबरोबर कोरियांतील युद्धबंदीमुळें मालाची मागणी एकदम घटली व त्यामुळें बरेच वर्षांनंतर बाजारपेठ गिऱ्हाइकांवर अवलंबून राहू लागली. १९५२ सालची मंदी ही पक्क्या मालापेक्षा कच्च्या मालाला अधिक जाणवली व त्यामुळें पक्का माल उत्पादन करणाऱ्यांना ती उपकारक ठरली. भारताच्या निर्यात व्यापारावर याचा प्रतिकूल परिणाम झाला. पण देशांतील धान्यपरिस्थिति सुधारल्यामुळें बाहेरील धान्याची आवक कमी करणें शक्य झालें आणि आपली आर्थिक घडी बरीच स्थिर राहिली. गेल्या वर्षांतील हीच आपली सर्वांत स्पृहणीय प्रगति होय. या प्रगतीमुळें व चालू हंगामाच्या पिकांबद्दलहि आशादायक परिस्थिति निर्माण झाल्यामुळें निर्नियंत्रणाच्या दिशेनें वाटचाल करणें शक्य झालें. देशाच्या औद्योगिक उत्पादनांतहि चांगली वाढ झाली. लोखंड व पोलाद आणि चहा व ताग या धंद्यांत मात्र ही वाढ अपेक्षेप्रमाणें झाली नाहीं. पहिल्यांत मजूर–मालकसंबंधांतील बेबनावामुळें उत्पादन घटलें, तर ताग व चहा यांच्या बाबतींत घसरलेल्या किंमतीमुळें उत्पादन कमी करणें भाग पडलें. अनावश्यक चलनवाढ एकंदर बऱ्याच राष्ट्रांत कमी झाली आणि संबंधी शासनसंस्थांचें धोरण किंमतींची पातळी वर ठेवण्यापेक्षा व्यापाराची वाढ करण्याच्या दिशेनें चालूं लागलें. युरोपांतील कांहीं देशांतून क्रेडिटवरील निर्बंध सैल झाले आणि कांहींतून तर बँक रेटहि उतरविण्यांत आला. भारताच्या सद्यःस्थितींत या उपाययोजनांची आवश्यकता अद्याप निर्माण झालेली नाहीं; तरीहि पण खासगी उद्योग–धंद्यांना व निर्यात व्यापाराला उत्तेजन देण्याचे दृष्टीनें आपल्याहि आर्थिक धोरणांत वास्तववादी भूमिका घेण्याकडे निश्चित फरक झालेला दिसून येतो. या फरकामुळें व्यापारउदीमांस पुन्हां चालना मिळेल व खासगी मालकांच्या उद्योग–धंद्यांस आवश्यक असलेलें भांडवल त्यांत गुंतविण्यास लोकांस विश्वास निर्माण होईल, अशी आशा करण्यास हरकत नाहीं. पण आजपर्यंत युद्धानें वाताहात झाल्यामुळें जागतिक बाजारपेठेंतून उठविलीं गेलेलीं राष्ट्रें पुन्हां आपला माल तेथें आणणार व त्यामुळें यापुढील काळांत स्पर्धा तीव्रतर होत जाणार हें दृष्टीआड करून चालणार नाहीं आणि आपली प्रगति आपण या स्पर्धेत किती टिकूं शकतों यावर अवलंबून राहील. ही स्पर्धा मालाच्या प्रतींत तर होईलच; पण त्याहीपेक्षा ती स्पर्धा मालाच्या किंमतींतच अधिक तीव्र होण्याचा संभव आहे व त्याकरितां आधीच महागड्या उत्पादन खर्चानें बेजार झालेल्या उद्योग–धंद्यांवर चलनवाढीचा अधिक ताण न टाकण्याची दक्षता घेतली पाहिजे. त्या दृष्टीनें आपल्या पंचवार्षिक योजनेंत गृहीत धरलेल्या तुटीच्या अर्थसंकल्पाच्या अनुषंगानें होणाऱ्या किंमतींच्या निर्देशकांकडे काळजीपूर्वक लक्ष देणें अगत्याचें आहे. आपले अर्थमंत्री त्या गोष्टींची योग्य ती काळजी घेतीलच.

### लहान–मोठ्या बँकांच्या क्षेत्राबाबत धोरण ठरविलें पाहिजे.

"बँकांच्या दृष्टीनें गेलें वर्ष हें स्थैर्याचेंच गेलें. गेल्या वर्षीच्या तुटीच्या अर्थसंकल्पाच्या दृष्टीनें पाहतां चलनांत झालेली वाढ त्या मानानें कमीच आहे. जॉइंट स्टॉक बँकांच्या ठेवींत अल्प प्रमाणांत वाढ झाली. क्रेडिटबाबतची परिस्थिति सामान्य परिस्थितींतल्यासारखी होती. बँकांच्या शाखांच्या संख्येंत मात्र वाढ झालेली दिसून येते. गेल्या वर्षी आपल्या बँकेनें नवीन शाखा उघडली नाहीं. पण मोठ्या पांच बँकांपैकी कांहींनीं जिल्ह्याचे ठिकाणीं कांहीं शाखा उघडल्या. शाखाविस्ताराचे बाबतींत बँकांवर कोणतीं बंधनें असावींत व निरनिराळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या बँकांना तीं कोणत्या पद्धतीनें लागू करावींत यासंबंधीं निश्चित स्वरूपाचें सर्वसाधारण विधान करणें उचित होणार नाहीं. त्याचप्रमाणें स्थानिक अगर प्रादेशिक बँकांना केवळ त्यांची साधनसामुग्री तोकडी आहे म्हणून कांहीं खास सवलती बहाल कराव्या अगर कांहीं विशिष्ट क्षेत्र त्यांचेसाठी राखून ठेवावें असें म्हणणेंहि योग्य होणार नाहीं. पण एखादी स्थानिक अगर प्रादेशिक बँक जर आपल्या क्षेत्रांत बँकिंगचे आदर्श संकेतानुसार जबाबदारीनें व योग्य प्रकारानें काम करीत असेल तर अशा क्षेत्रांत दुसरा एखाद्या मोठ्या बँकेला शाखा काढण्यास परवानगी देणें कितपत उचित होईल हा प्रश्न विचारांत घेण्यासारखा आहे. ज्या बँका आज परदेशी हुंडणावळीचा धंदा करतात अगर करण्याची ईर्षा धरतात. अशा मोठ्या बँकांना स्थानिक अगर प्रादेशिक बँका असलेल्या ठिकाणीं शाखा काढण्याची परवानगी दिल्यास आपल्या भक्कम साधनसामुग्रीच्या पाठबळावर अशा बँकांच्या शाखा यापूर्वीच्या बँकेपेक्षा कितीतरी सवलतींच्या शर्तीवर व अत्यल्प नफ्यावर काम करूं शकतील व अनेक वर्षे तपश्चर्या करून त्यांनीं निर्माण केलेलें धंद्याचें क्षेत्र हां हां म्हणतां काबीज करूं शकतील. शिवाय, अशा बँकांचें लक्ष तेथें केवळ ठेवी जमविण्याकडे व त्याचा उपयोग मोठ्या अगर परदेशी

व्यापाराकडे करण्याकडेच अधिक असणार हें उघड आहे. तेथें जमा केलेल्या ठेवींचा पैसा स्थानिक व्यापारउद्योगाची गरज भागविण्यासाठीं त्या वापरत नाहींत असा अनुभव आहे. ही परिस्थिति कितपत इष्ट आहे याचा विचार होणें आवश्यक आहे. अशा परिस्थितींत देशांत बँकिंगची वाढ होण्याच्या दृष्टीनें निरनिराळ्या लहानमोठ्या बँकांनीं कोणते क्षेत्रांत काम करावें यासंबंधीं रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांनीं एक स्थूल धोरण ठरवून तें जाहीर करावें म्हणजे निरनिराळ्या बँकांना आपल्या कार्याची व विस्ताराची दिशा निश्चित करून त्याप्रमाणें कार्य करणें सुलभ होईल.

### मोठ्या रकमांच्या नोटा कशाला ?

" बँकिंगबाबतच्या आणखीहि एकदोन गोष्टींचा उल्लेख येथें करणें अप्रस्तुत होणार नाहीं. सध्यां सर्वच बँकांना बँकिंग कंपनीज ॲक्ट लागू असल्यामुळें रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेण्याच्या बाबतींत शेड्यूल्ड व नॉन-शेड्यूल्ड बँका असा फरक करण्याचें कांहीं कारण नाहीं. गतवर्षीं रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ॲक्टला एक दुरुस्ती करून मोठ्या रकमांच्या नोटा पुन्हां काढण्यास तिला अधिकार देण्यांत आला आहे. बँकिंगबाबतचे कायद्याचा अंतिम उद्देश लोकांतील चलनाचे साठेबाजीची प्रवृत्ति नष्ट करणें व देशांत बँकिंगची वाढ करणें हा असला पाहिजे. या दृष्टीनें ऐशीं टक्के कृषिप्रधान लोकसंख्या असलेल्या व माणशीं दरसाल ३०० रुपयांचे पेक्षाहि कमी उत्पन्न असलेल्या देशांत एक हजार, पांच हजार व दहा हजार अशा मोठ्या रकमांच्या नोटा पुन्हां व्यवहारांत आणण्याची आवश्यकता कां भासावी याचा उलगडा होत नाहीं.

### महाराष्ट्र बँकेची प्रगति

" आपल्या ठेवींमध्यें गेल्या वर्षीं बरीच वाढ झाली आहे व त्या २,८१,००,००० रु. वरून ३,४९,००,००० वर आलेल्या आहेत. त्यामुळें आपलें खेळतें भांडवल रुपये चार कोटी रुपयांवेवर गेलें आहे. ठेवींत वाढ झाल्यामुळें आपली सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणूकहि वाढविण्यांत आली आहे व त्याची रक्कम १९५२ सालीं १,२१,००,००० रु. होती ती आतां जवळजवळ १,४०,००,००० रु. झाली आहे. रोकड व बँकांकडील शिल्लकहि प्रमाणतः वाढली आहे व त्यामुळें आपलें खेळते भांडवलाशीं लिक्विडिटीचें प्रमाण चांगलें राहिलें आहे. कर्जाऊ दिलेल्या रकमाहि वाढून त्यांचा आंकडा रु. १,४१,००,००० वरून रु. १,७६,००,०००वर आलेला आहे. त्यामुळें उत्पन्नाची बाजू वाढली आहे. खर्चाचे बाजूकडे पाहतां ठेवींवर दिलेलें व्याज व नोकरवर्गावरील खर्च यांत विशेष वाढ झाली असल्याचें दिसून येईल. नाणेबाजारांतील तंगीमुळें अत्यल्प व अल्प मुदतीच्या ठेवींवर अधिक दरानें व्याज द्यावें लागलें. नोकरवर्गावरील खर्चांत झालेली वाढ ही नोकरवर्गाच्या संख्येंत झालेल्या वाढीमुळें झालेली आहे व ती वेळोवेळीं प्रसिद्ध झालेल्या अवॉर्डनीं ठरवून दिलेल्या स्केलप्रमाणें आहे. खर्चाचे इतर बाबींत विशेष उल्लेख करण्यासारखी वाढ झालेली नाहीं. इतकी वाढ होऊनहि नफ्याचें प्रमाण वाढत्या भांडवलाशीं योग्य त्या प्रमाणांतच राहिलें आहे. संचालकांचे शिफारशीप्रमाणें नफ्याची वांटणी झाल्यावर आपली एकंदर गंगाजळी रु. ७,००,००० होईल. आपलें वसूल भांडवल सोळा लाख रु. आहे. अठरा वर्षांत झालेली ही प्रगति आपणांस समाधानकारक वाटेल असा मला विश्वास वाटतो.

" श्री. धों. कृ. साठे यांनीं संचालक व अध्यक्ष या दोन्ही नात्यांनीं बँकेची जी सेवा केली आहे तिचा मला तेथें अवश्य उल्लेख केला पाहिजे. या बँकेचे स्थापनेचा विचार चालू होता तो दिवस मला आठवतो. श्री. धों. कृ. साठे यांचें अविरत आणि कळकळीचे श्रमामुळेंच बँकेची स्थापना करणें सुलभ झालें. तेव्हांपासून बँकेचें कोणत्याहि कार्यास त्यांनीं आपले व्यवहारांत नेहमींच अग्रस्थान दिलें आहे. श्री. धों. कृ. साठे यांनीं बँकेची ही जी सेवा केली त्याबद्दल संचालकमंडळानें त्यांचा गौरवपर ठराव केला आहे. "

---

**केळ्याचें निर्जलीकरण**—मध्यप्रदेश सरकारच्या उद्योगखात्यानें केळ्यांचें निर्जलीकरण करण्याचे प्राथमिक प्रयोग केले आहेत. ते बरेच यशस्वी झाले असून पूर्णपणें यशस्वी झाल्यास केळ्यांच्या उत्पादकांना त्यांचा चांगला उपयोग होईल. खात्यानें फळें टिकविण्याच्या धंद्याचें शिक्षण देणारा वर्ग काढला असून त्याला स्त्रियांची बरीच गर्दी होते.

**अफगाणिस्तान जागतिक बंकेचा सभासद होणार**—अफगाण सरकार जागतिक बँक आणि इंटरनॅशनल मॉनेटरी फंड ह्यांच्या सभासदत्वासाठीं अर्ज करणार आहे. परराष्ट्रांत कर्जें उभारतां यावीं व अफगाण चलनाची हुंडणावळ स्थिर व्हावी, हा त्याचा उद्देश आहे.

**ब्रिटिश कारखान्यांत कृष्णवर्णीय कामगार**—ब्रिटिश कारखान्यांतील कनिष्ठ प्रतीचीं कामें करण्यासाठीं अधिकाधिक कृष्णवर्णीयांची नेमणूक होऊं लागली आहे. जेथें कपडे खराब होणार नाहींत, अशींच कामें इंग्रज मुलांना हवीं असल्यानें, ही परिस्थिति निर्माण झाली आहे. वेस्ट इंडीजमधून मूळ आलेल्यांच्या मुलांना ही चांगली संधि वाटत आहे.

**अहमदाबादसाठीं पोहण्याचा तलाव**—अहमदाबाद कॉर्पोरेशननें शहरांत एक पोहण्याचा तलाव बांधण्याचें ठरविलें आहे. तलावाला सुमारें १ लाख रुपये खर्च येईल. तज्ज्ञांचा सल्ला घेऊन वरील योजना पूर्ण करण्यांत येणार आहे. शहरांतील लोकांना शुद्ध दुधाचा पुरवठा करण्याचेंहि ठरविण्यांत आलें आहे.

**वेस्ट मिन्स्टरची दुरुस्ती**—लंडनमधील वेस्ट मिन्स्टर ॲबे ही इतिहासप्रसिद्ध इमारत दुरुस्त करण्यासाठीं एक फंड काढण्यांत आला आहे. फंडाची रक्कम आतांपर्यंत ९,५०,००० पौंड जमली असून संकल्पाप्रमाणें अद्याप ५०,००० पौंड जमावयाचे आहेत. ऑस्ट्रेलिआच्या सरकारनें ५,००० पौंड रकमेची देणगी दिली आहे.

**चित्रपटांची अदलाबदल**—इटली आणि रशिआ ह्यांनीं परस्परांचे चित्रपट अदलाबदलीच्या पद्धतीनें देण्या-घेण्याचें ठरविलें आहे. उभयतां देशांचे प्रतिनिधी आपणांस वाटतील ते चित्रपट निवडणार आहेत. इटालिअन फिल्म प्रोड्यूसर्स असोसिएशनचे अध्यक्ष एटल मोनॅको नुकतेंच मॉस्कोला गेले असतांना हा व्यवहार ठरविण्यांत आला.

**भारतीय विमानदलासाठीं फ्रेंच विमानें**—फ्रान्सचे विमानखात्याचे सेक्रेटरी पॅरिसमधील हिंदी वकिलांसह नवी दिल्ली येथें आले आहेत. भारतीय विमानदलासाठीं ऑरेगॉन जातीचीं लढाऊ विमानें पुरविण्यासाठीं ते भारतीय सरकारशीं वाटाघाटी करणार आहेत. गेल्या वर्षीं भारतानें फ्रान्सकडून ह्या जातीचीं ७१ लढाऊ विमानें विकत घेतलीं आहेत.

## मध्य सरकाच्या अंदाजपत्रकाचा दृष्टिकोन

लेखक : भा. म. काळे, एम्. ए., बी. टी.

मध्य सरकारच्या चालू वर्षी सादर करण्यांत आलेल्या अंदाजपत्रकांत पुढील गोष्टी मुख्यत्वें दिसून येतात. (१) करविषयक चौकशीकमिशनचा अहवाल चालू वर्षअखेर प्रसिद्ध होणार असल्यामुळें १९५४–५५ च्या अंदाजपत्रांत करविषयक योजनेंत महत्त्वाचे बदल करण्यांत आले नाहींत. (२) गेल्या १२ वर्षांत प्रत्यक्ष करांचें प्रमाण बरेंच वाढलें असल्यामुळें चालू वर्षी अप्रत्यक्ष करांच्या वाढीला थोड्या प्रमाणांत सुरवात करण्यांत आली आहे. सुपारी, सिमेंट, साबण, पादत्राणें व कृत्रिम रेशीम यांच्या बाबतींत झालेली करवाढ अशा स्वरूपाची आहे. (३) अजूनपर्यंत, १९२४ पासून, जनतेनें संरक्षक जकातींचा बोजा मोठ्या प्रमाणांत सहन केला आहे. यापुढें अशा स्वरूपाच्या जकातींऐवजीं अंतर्गत उत्पादनावरील जकातींचें प्रमाण वाढविण्यांत येईल व त्याला सुरवात १९५४–५५ च्या अंदाजपत्रकापासून करण्यांत आली आहे. कस्टमच्या जकातींपेक्षा अंतर्गत उत्पादनावरील जकात हें उत्पन्न मिळण्याचें जास्त निश्चित स्वरूपाचें साधन आहे. (४) गेल्या वर्षी रु. ४० कोटी खर्च बिन–तारणाच्या नोटा प्रसृत करून भागविण्यांत आला, हा उल्लेख अर्थमंत्र्यांनीं जानेवारी महिन्यांत केलाच होता. गेल्या वर्षाच्या अंदाजपत्रकांत बिनतारणाच्या नोटा छापाव्या लागतील हें अर्थमंत्र्यांनीं सांगितलें होतें. पंचवार्षिक योजनेसाठी पुढील दोन वर्षांत सुमारें रु. १२०० कोटी खर्च करावा लागणार असल्यामुळें, व सरकारला पैसा मिळण्याचे इतर सर्व मार्ग पूर्णपणें उपयोगांत आणले गेल्यामुळें यापुढें मोठ्या प्रमाणांत बिनतारणाच्या नोटा काढणें आवश्यक झालें आहे व तें योग्यहि आहे, असें जोरदार भाषेंत अर्थमंत्र्यांनीं प्रतिपादिलें आहे. १९५४–५५ मध्यें रु. २५० कोटि किंमतीच्या बिन–तारणाच्या नोटा सरकारला प्रसृत कराव्या लागतील (५) अर्थमंत्र्यांच्या भाषणावरून आणखी असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, राज्यसरकारें पंचवार्षिक योजनेसाठी पैसा उभारण्याचें काम जरूर त्या प्रमाणांत पूर्ण पाडीत नाहींत. हीं सरकारें केवळ मध्यवर्ती सरकारच्या मदतीवरच मोठ्या प्रमाणांत अवलंबून असतात. १९५४–५५ मध्यें राज्यसरकारांना पंचवार्षिक योजनेसाठी कर्ज वगैरेंच्या रूपानें मदत म्हणून मध्य सरकारला रु. २१४ कोटि खर्च करावा लागेल. राज्यसरकारें कांहीं बाबतींत मध्यवर्ती सरकारशीं विसंगत धोरण ठेवतात. त्यामुळेंहि रचनात्मक कार्यक्रमाला योग्य त्या प्रमाणांत यश येत नाहीं. सरकारला रु. २५० कोटींच्या बिन–तारणाच्या नोटा काढाव्या लागणार आहेत याची मुख्य जबाबदारी राज्य–सरकारांवर पडते. तेव्हां राज्य–सरकारांनीं आपली जबाबदारी मनःपूर्वक योग्य रीतीनें पार पाडली तर नंतरच्या काळांत बिन–तारणाच्या नोटा काढण्याचा प्रसंग मध्य सरकारवर येणार नाहीं असें अर्थमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्टपणें सांगितलें आहे. (६) एकंदर आर्थिक परिस्थिति समाधानकारक असून यापुढें सामान्य जनतेच्या हातांत जास्त पैसा आल्याशिवाय सामान्य जनतेची क्रयशक्ति सुधारणार नाहीं व सर्वसाधारण उद्योगधंद्यांची परिस्थिति सुधारण्यासाठी व बेकारी नष्ट होण्यासाठी सामान्य जनतेची क्रयशक्ति बिन–तारणाच्या नोटा प्रसृत करून वाढविली पाहिजे. अशी अर्थमंत्र्यांची विचारसरणी आहे. (७) आर्थिक परिस्थिति चांगली आहे असें म्हणतांना, बचतयोजना व कर्जें यांच्या रूपानें १९५३–५४ मध्यें अंदाजाप्रमाणें पैसा सरकारच्या हातीं आलेला नाहीं हें अर्थमंत्र्यांनीं मान्य केलें आहे. (८) परराष्ट्रीय व्यापार कमी झाला असला तरी व्यापारी देण्याची परिस्थिति निश्चितपणें सुधारत आहे ही गोष्ट लंडन येथील स्टर्लिंग शिलकेंतील रक्कम रु. ७०६ कोटींपासून रु. ७२३ कोटींपर्यंत वाढली आहे, व गेल्या वर्षी डॉलर्सची तूट १२७ कोटी आली होती त्याऐवजीं चालू वर्षी १८ कोटी डॉलर्स मिळूं शकले हें या आंकड्यांवरून दिसून येतें. (९) पाकिस्तानकडून मात्र कर्जाच्या हप्त्याचें रु. १८ कोटी यावयास पाहिजे होते ते न आल्यामुळें १९५३–५४ च्या दुरुस्त अंदाजपत्रकांत तूट रु. १६ कोटी, ९६ लक्ष येणार आहे.

आज जनतेच्या हातीं थोडा जास्त पैसा येईल तर आपल्या देशाच्या औद्योगिक उत्पादनाला चालना मिळेल, त्यामुळें बेकारी हळूहळू दूर होईल, व जास्त क्रयशक्तीमुळें लौकरच अर्थव्यवस्था मजबूत बनेल. यासाठींच अर्थमंत्र्यांनीं बिनतारणाच्या नोटा छापून तूट भरून काढण्याचें ठरविलें आहे.

बिनतारणाच्या नोटा प्रसृत करून तूट भागविली जाऊं नये असें अर्थशास्त्राचें मत असलें तरी एखाद्या वेळीं तात्पुरता उपाय म्हणून थोड्या प्रमाणांत बिनतारणाचें चलन काढणें योग्य ठरतें; मात्र असें करतांना दोन गोष्टींबद्दल दक्षता बाळगावी लागते. त्या ह्या कीं, वाढतें चलन जरूर त्या मालाच्या खरेदीसाठी उपयोगांत आणलें गेलें जाऊन त्यामुळें औद्योगिक उत्पादनाला चालना मिळाली पाहिजे, व वाढत्या चलनामुळें वस्तूंचे बाजारभाव वाढतां कामा नयेत. हीं दोन पथ्यें पाळण्यांत आलीं तरच बिनतारणाच्या थोड्याशा नोटांमुळें अर्थव्यवहाराला धोका पोंचत नाहीं, व उलट अर्थव्यवहार सुधारण्याला मदत होते. मार्च १९५५ पर्यंत बिनतारणाच्या चलनाचा काय परिणाम होतो हें प्रत्यक्ष दिसून येणार आहेच. तेव्हां या मुद्याची जास्त चर्चा करण्यांत अर्थ नाहीं. मात्र हा प्रयोग फार सावधगिरीनें केला गेला व जरूर तीं नियंत्रणें पाळलीं गेलीं तरच यशस्वी होऊं शकेल. परंतु डिसेंबर १९५३ व जानेवारी १९५४ या दोन महिन्यांत सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतींच्या निर्देशांकांत, कांहींहि दृश्य कारण नसतांना ३८६ पासून ३९९ पर्यंत वाढ झाली ही गोष्ट काळजी उत्पन्न करणारी आहे असें वाटतें. रु. ४० कोटी किंमतीच्या बिन तारणाच्या नोटा प्रसृत करण्यांत आल्या याचा या वाढीशीं कांहीं संबंध आहे कीं काय, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

अप्रत्यक्ष करवाढीवर यापुढें भर द्यावा लागेल हें योग्य असलें तरी आजच्या परिस्थितींत सुपारी, साबण, पादत्राणें व कृत्रिम रेशीम याबाबतींत केलेली करवाढ सामान्य जनतेलाच जास्त जाचक ठरणार आहे. लुधियाना येथील कृत्रिम रेशमी कापडाचे कारखाने त्यामुळें बंद ठेवावे लागले आहेत, व साबण कारखानदारांमध्येंहि अस्वस्थतेचें वातावरण पसरलें आहे. कापसाच्या आयातीवर जकात रद्द केल्यामुळें कापडकारखानदारांना थोडेंसें समाधान वाटत आहे, व ही जकात रद्द करण्यांत एक योग्य तत्त्व मान्य झालें आहे असें म्हटलें पाहिजे. मुलकी खर्चामध्यें काटकसर साध्य होत नाहीं हेंहि अंदाजपत्रकावरून स्पष्ट होतें. यंदाच्या अंदाजपत्रकांत बिनतारणाच्या नोटा प्रसृत करण्याचा नवीन प्रयोग मोठ्या प्रमाणांत करण्यांत येणार आहे. हा प्रयोग आपल्या अर्थव्यवस्थेला मानवल्यास आर्थिक परिस्थिति सुधारावयास मदत होईल, असें दिसतें.

## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

रेल्वेची निव्वळ शिल्लक घटत जाणार व खर्चाचें प्रमाण मात्र वाढत जाणार, हें स्पष्टपणें दिसून येतें. गेल्या वर्षी रु. ९ कोटि, ३१ लक्ष निव्वळ शिल्लक राहील असा अंदाज करण्यांत आला होता. त्याऐवजीं चालू वर्षी फक्त रु. ५ कोटि, १४ लक्ष शिल्लक राहणार असून पुढील वर्षी शिल्लक फक्त रु. ३ कोटि, १८ लक्ष राहील. दोन वर्षांपूर्वी शिल्लक रु. २८ कोटि उरली होती. अलीकडे उतारू लोकांपासून होणारें उत्पन्न हळूहळू घटत जात आहे, तेव्हां यापुढें रेल्वेनें तिसऱ्या वर्गाच्या भाड्याचे दर कमी करून, प्रवासाला चालना देऊन उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. यंदा शैक्षणिक स्वरूपाच्या व हिल-स्टेशनांच्या प्रवासाला उत्तेजन देण्यासाठी थोडी सवलत देण्यांत आली आहे, ही गोष्ट योग्यच आहे. रेल्वेंत गुंतलेल्या रु. ८५० कोटि भांडवलावर सध्यां ४ टक्के व्याज आकारलें जातें. या बाबतींत व्याजाचा नवीन दर ठरविण्यासाठी चालू वर्षी रेल्वेमंत्री एक कमिटी नेमणार आहेत. दोन वर्षांपूर्वी रेल्वेचा सामान्य खर्च रु. १८८ कोटि होता तो चालू वर्षी रु. १९७॥ कोटींपर्यंत वाढला. पंचवार्षिक योजनेप्रमाणें रेल्वेसाठी पांच वर्षांत रु. ४०० कोटि भांडवली खर्च झाला पाहिजे. यापैकी रु. ८० कोटि हिंद सरकार देईल, व बाकीचे रु. ३२० कोटि रेल्वेनेंच उभारावयाचे आहेत. १९५१-५३ मध्यें भांडवली खर्च रु. १३१ कोटि झाला, चालू वर्षी रु. ७८ कोटि खर्च होईल व १९५४-५५ मध्यें रु. ९५ कोटि खर्च केला जाईल. लखनौ येथें रेल्वे संशोधन सेंटर सुरू करण्यांत आला आहे ही एक विशेष गोष्ट आहे. रु. ४ कोटि ६० लक्ष खर्च कामगारवर्गाचीं घरें बांधण्यासाठी पुढील वर्षी केला जाईल. रेल्वेंत दिसून येणाऱ्या लांचलुचपतीबद्दल चौकशी करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या कमिटीचें काम चालू आहे. लहान स्टेशनांचे प्लॅटफॉर्म सुधारणें, स्टेशनवर पिण्याच्या पाण्याची सोय करणें व तिसऱ्या वर्गातील उतारूंची गर्दी कमी करणें या गोष्टींकडे रेल्वेखात्याचें लक्ष आहे. गेल्या वर्षी एप्रिल १९५३ पासून १९० नवीन गाड्या सुरू करण्यांत येऊन १२६ गाड्यांचे मार्ग वाढविण्यांत आले.

रेल्वे इंजिनें व डबे या बाबतींत टंचाई दूर झाली म्हणजे दर वर्षी २०० इंजिनें व २ हजार उतारू व मालाचे डबे अशी जरूरी लागेल. ही गरज चित्तरंजन, पेरांबूर इ. ठिकाणच्या कारखान्यांतून पूर्णपणें हळू हळू भागविली जाईल असा रेल्वेमंत्र्यांना विश्वास वाटत आहे. आर्थिक दृष्ट्या रेल्वेचा कारभार यशस्वी होण्यासाठी इंजिनें व डबे देशांतच बनविले जाणें अगदीं आवश्यक आहे.

यापुढें रेल्वेनें उद्योगधंदे व व्यापार यांचा विकास होऊं शकेल अशा भागांतून रेल्वेरस्ते तयार केले पाहिजेत. हळू हळू मीटर गेजच्या रेल्वेचें रुंद गेजच्या रेल्वेंत रूपांतर करणें आवश्यक आहे व याहि गोष्टींकडे रेल्वेमंत्र्यांचें लक्ष आहे. परंतु वाहतुकीचें साधन म्हणून रेल्वेमार्ग, मोटारींचे मार्ग, अंतर्गत नद्यांतून व किनाऱ्यावरील जलवाहतूक या सर्वांमध्यें कांहींतरी एकसूत्रीपणा राखण्याचे प्रयत्न केले जाणें आवश्यक आहे.

**भारतीय चहाची प्रसिद्धि**—प. जर्मनींत भारतीय चहाचा खप वाढावा म्हणून भारतीय सरकारनें कांहीं जर्मन कंपन्यांशीं सहकार्य करून एक कंपनी काढली आहे. ह्या कंपनीच्या प्रसिद्धीच्या कार्यक्रमांत सीलोन आणि इंडोनेशिआहि भाग घेतील अशी अपेक्षा आहे. ३०, सप्टेंबर १९५५ पर्यंत कंपनी चहाच्या जाहिरातींवर १० लाख मार्कस् खर्च करणार आहे. त्यापैकीं दोन-तृतियांश रक्कम भारत सरकार देणार आहे.


**BHOR STATE BANK LIMITED,**

## NOTICE

Notice is hereby given that the 10th ordinary General Meeting of the Share-holders of the Bhor State Bank Ltd., will be held at 361-62 Budhawar Peth, Poona City, at 5 P. M. (S. T.) on Friday the 26th March 1954 to transact the following business.

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended 31st December 1953.

(2) To elect Directors in place of retiring Directors.

(3) To appoint auditors.

By order of the Board.

Shirwal
28-2-54

**N. V. Pandav,**
*Manager*

*N. B.*—The share transfer books will be closed from 22-3-54 to 6-4-54.

## नोटीस

### दि भारत इंडस्ट्रियल बँक लिमिटेड, पुणें २.

नोटीस देण्यांत येते कीं, बँकेच्या भागीदारांची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार ता. २१ मार्च १९५४ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस ९३/२ ब, बुधवार पेठ, पुणें २ या ठिकाणीं खालील कामासाठी भरेल :—

( १ ) बँकेचा दिनांक ३१ डिसेंबर १९५३ अखेरचा ताळेबंद, नफातोटापत्रक आणि संचालकमंडळाच्या व ऑडिटरांच्या रिपोर्टांचा विचार करणें.

( २ ) ६% क्यु. प्रे. शेअर्सवर डिव्हिडंड मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेरनिवडणुकीस पात्र असलेल्या ) संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें.

( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारीं इतर कामें.

पुणें शहर,
ता. २०-२-१९५४

बोर्डाचे हुकुमावरून,
एन. एन. क्षीरसागर,
आर. वी. साळवेकर
मॅ. डायरेक्टर्स.

वि. सू. :— बँकेचीं शेअर ट्रान्सफर बुकें दि. १५ मार्च १९५४ ते ३१ मार्च १९५४ ( दोन्ही दिवस धरून ) बंद रहातील.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीराद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.